| | | |
|---|---|---|
| | **वाकड पोलीस ठाणे,<br>पोलीस आयुक्तालय, पिंपरी - चिंचवड** | |
| **प्रेसनोट** | | दिनांकः २७/११/२०२४ |

## लिव्ह अॅन्ड रिलेशन मध्ये राहणा-या महिलेची हत्या करुन पुरावा नष्ट करण्याकरीता प्रेत खंबाटकी घाट, सातारा येथे फेकुन देवुन वाकड पोलीस ठाणे येथे मिसींग तक्रार देणा-या प्रियकरानेच तिची हत्या केल्याचा गुन्हा १२ तासाचे आत उघड. वाकड पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड यांची कामगिरी

----------oo----------

दिनांक २६/११/२०२४ रोजी वाकड पोलीस ठाणे येथे दिनेश पोपट ठोंबरे, वय ३२ वर्षे धंदा -नोकरी रा. मु बहुर पो करुंज, ता मावळ यांने त्याची प्रेयसी जयश्री विनय मोरे वय २७ वर्षे रा , अॅड्रेस टॉवर मारूंजी , हिंजवडी दिनांक २५.११.२०२४ रोजी रात्री ११.३० वाजेच्या सुमारास जिंजर हॅाटेल, भुमकर चौक,वाकड येथून काही न सांगता निघून गेली ती परत न आलेने दिलेल्या तक्रारीवरुन मनुष्य मिरिंग नोंद क्रं- ३३४/२०२४ दि.२६/११/२०२४ प्रमाणे दाखल करण्यात आली आहे.

सदर मिसिंगच्या तपासादरम्यान मिसिंग महिलेच्या वर्णनाचे एक प्रेत खंबाटकी घाट (खंडाळा) जि सातारा येथे मिळून आले असुन तिचे डोक्यावर गंभीर जखमा आहेत अशी माहिती खंडाळा पोलीस ठाणे यांचेकडुन प्राप्त झाली. प्रेताचे फोटोवरुन जयश्री विनय मोरे या मिसींग महिलेची डेडबॉडी असलेची खात्री झाली.

मयत महिलेच्या अंगावरील जखमांवरुन तिची हत्या झाली असल्याने, तांत्रीक तपास इतर माहीती वरून तक्रारदार दिनेश ठोंबरे यानेच तिची हत्या केल्याचा संशय असल्याने त्यास विजय नगर, काळेवाडी येथून ताब्यात घेवुन त्याचेकडे कौशल्यपुर्ण चौकशीमध्ये त्याने नमुद महिलेचे दुसरे पुरुषा बरोबर सबंध असल्याचा संशय व त्यास पैशाची मागणी या कारणामुळे त्याने दि. २४/११/२०२४ रोजी रात्रौ ११.०० वा. दरम्यान जिंजर हॅाटेल सर्व्हिस रोड, भुमकर चौक परिसरात भांडणे झाली त्यावेळी त्याने त्याचे कारमधील हातोडी जयश्री मोरे हिचे डोक्यात मारुन गंभीर जखमी करून तिचे प्रेत सातारा हायवेने कारमधुन नेऊन खंबाटकी घाट (खंडाळा) जि सातारा परिसरात पुरावा नष्ट करण्यासाठी फेकून दिल्याची कबुली दिली. तसेच दि. २५/११/२०२४ रोजी मयत महिलेचा ३ वर्षाचे मुलास आळंदी येथे सोडुन दिलेनंतर मध्यरात्री वाकड पोलीस ठाणे येथे नमुद महिला जयश्री मोरे हि मिसिंग असलेबाबत तक्रार दिल्याने वाकड पोलीस ठाणे मनुष्य मिसींग क्र.३३४/२०२४ दि.२६/११/२०२४ रोजी दाखल करण्यात आली आहे. मयत महिलेचा मृतदेह खंडाळा पो ठाणे सातारा हद्दीत मिळुन आल्याने सर्व संबंधीत कागदपत्रे प्राप्त करुन वाकड पोलीस ठाणेकडुन पुढील तपास करीत आहोत.

सदरची कामगिरी मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. डॉ. शशीकांत महानवर, पोलीस सह आयुक्त, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, श्री. विशाल गायकवाड सो, पोलीस उप आयुक्त, परि-२, श्री. सुनिल कुराडे, सहा. पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग यांचे मार्गदर्शना खाली वाकड पोलीस ठाणेकडील श्री. निवृत्ती कोल्हटकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सपोनि, सुभाष चव्हाण, पोउपनि. अनिरुध्द सावर्डे, पोउपनि भारत माने, श्रेणी पोउपनि. बिभीषण कन्हेरकर, पोलीस अंमलदार वंदु गिरे, नामदेव वडेकर, रामचंद्र तळपे, तात्यासाहेब शिंदे, सौदागर लामतुरे, कोतेंय खराडे, यांनी केली आहे.

**(विशाल गायकवाड)**
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ -२, पिंपरी चिंचवड